**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________

   (Name) ____________________

2. (Signature) ____________________

   (Name) ____________________

**Answer Sheet No. :** ..............................................

(To be filled by the Candidate)

**Roll No.** | | | | | | | | |

(In figures as per admission card)

**Roll No.** ____________________

(In words)

**Test Booklet No.**

**J—3805**

**PAPER—II**

# MARATHI

**Time : 1¼ hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **12** Number of Questions in this Booklet : **50**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of fifty multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the question booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the Serial No. of the booklet should be entered in the Answer-sheets and the Serial No. of Answer Sheet should be entered on this Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the oval as indicated below on the correct response against each item.

   **Example :** (A) (B) ⬤ (D)

   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the Answer Sheet given **inside the Paper I booklet only**. If you mark at any place other than in the ovals in the Answer Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your name or put any mark on any part of the test booklet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is NO negative marking.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए।
2. इस प्रश्न-पत्र में पचास बहुविकल्पीय प्रश्न हैं।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी। पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें। खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं। दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें। इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे। उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा।**
   (iii) इस जाँच के बाद प्रश्न-पुस्तिका की क्रम संख्या उत्तर-पत्रक पर अंकित करें और उत्तर-पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं। आपको सही उत्तर के दीर्घवृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है।

   **उदाहरण :** (A) (B) ⬤ (D)

   जबकि (C) सही उत्तर है।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पत्र I के अन्दर दिये गये** उत्तर-पत्रक पर ही अंकित करने हैं। यदि आप उत्तर पत्रक पर दिये गये दीर्घवृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिन्हांकित करते है, तो उसका मूल्यांकन नहीं होगा।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें।
8. यदि आप उत्तर-पुस्तिका पर अपना नाम या ऐसा कोई भी निशान जिससे आपकी पहचान हो सके, किसी भी भाग पर दर्शाते या अंकित करते हैं तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित कर दिये जायेंगे।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर उत्तर-पुस्तिका निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पैन का ही इस्तेमाल करें।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है।**
12. **गलत उत्तर के लिए अंक नहीं काटे जायेंगे।**

# MARATHI
# मराठी
## PAPER – II
## प्रश्नपत्रिका – II

**Note :** This paper contains fifty (50) multiple-choice questions, each carrying two (2) marks. Attempt all the questions.

**टीप :** या प्रश्नपत्रिकेत विविध विकल्प असलेले पन्नास (50) प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास दोन (2) गुण आहेत. सर्व प्रश्न सोडवा.

1. 'लीळाचरित्रा' च्या पुढिल चार पाठांचा योग्य कालानुक्रम कोणता ?

   (a) तळेगावकर पाठ (b) वाइंदेशकर पाठ (c) म्हाइंभट पाठ (d) हिराइसेचा पाठ

   (A) a b c d (B) c b d a

   (C) b c a d (D) c d a b

2. कालानुक्रमाने पुढील आत्मनिवेदने सांगा :

   (a) गबाळ (b) आठवणींचे पक्षी (c) बलुतं (d) कोल्हाट्याचं पोर

   (A) c b a d (B) a b c d

   (C) b c d a (D) d a c b

3. पुढील संतकवींचा कालानुक्रम सांगा.

   (a) निळोबा (b) तुकोबा (c) निवृत्तिनाथ (d) एकनाथ

   (A) b a d c (B) a c d b

   (C) b c a d (D) c d b a

4. पुढील शिलालेखांचा कालानुक्रम सांगा.

   (a) श्रवणबेळगोळचा शिलालेख (b) कुडलचा शिलालेख

   (c) अक्षीचा शिलालेख (d) अंबेजोगाईचा शिलालेख

   (A) a b c d (B) c d b a

   (C) b c a d (D) b d a c

5. पुढील बखरींचा कालानुक्रम लावा.

   (a) राक्षसतागडीची बखर (b) सभासदाची बखर

   (c) भाऊसाहेबांची बखर (d) सप्तप्रकरणात्मक चरित्र

   (A) a b c d (B) a b d c

   (C) a c b d (D) b d a c

6. कालानुक्रमाने पुढील शाहिरांच्या काव्यनिर्मितीची व्यवस्था कशी होईल ?

(a) रामजोशी (b) पठ्ठे बापूराव (c) अमरशेख (d) आगीनदास

(A) c d a b (B) d c b a

(C) d b c a (D) d a b c

7. पुढील लेखकांच्या लेखनाची कालानुक्रमाने नोंद करा.

(a) वि. स. खांडेकर (b) ना.मा. संत

(c) श्रीनिवास विनायक कुलकर्णी (d) विश्वास वसेकर

(A) a b c d (B) a c b d

(C) a d b c (D) b d a c

8. मराठीमध्ये गझल या काव्यप्रकारात पुढील कवींनी कोणत्या अनुक्रमाने निर्मिती केली ?

(a) सुरेश भट (b) माधव जूलियन (c) भाऊसाहेब पाटणकर (d) राजा बढे

(A) b a d c (B) b d c a

(C) b c d a (D) c d b a

9. पुढील नाटके कोणत्या कालानुक्रमाने रंगभूमीवर अवतरली ?

(a) 'एकच प्याला' (b) 'विद्याहरण' (c) 'गगनभेदी' (d) 'मतिविकार'

(A) c d a b (B) d c b a

(C) d a b c (D) d b a c

10. मठपती होण्याचा अधिकार मिळविणारी पहिली कवयित्री कोण ?

(A) बहिणाबाई (B) महदंबा (C) वेणाबाई (D) जनाबाई

11. धौम्य ऋषींच्या आत्मकथनाच्या स्वरुपात कोणी कांदबरी लिहिली ?

(A) वि. स. खांडेकर (B) वा. म. जोशी (C) नाथमाधव (D) श्री. व्यं. केतकर

12. इंग्रजी भाव कवितांच्या वि. मो. महाजनी यांनी रुपांतर केलेल्या कवितांच्या संग्रहाचे नाव कोणते ?

(A) भावार्थ सिंधु (B) भरली घागर (C) इंदिरा (D) कुसुमांजली

13. लक्ष्मण गायकवाड यांच्या आत्मकथनाचे शीर्षक कोणते ?

(A) 'उपरा' (B) 'मुक्काम पोस्ट देवाचं गोठणं'

(C) 'अक्करमाशी' (D) 'उचल्या'

14. 'गांधी आणि आंबेडकर' या नाटकाचे लेखक कोण ?

(A) दत्ता भगत (B) भि. शि. शिंदे (C) प्रेमानंद गज्वी (D) दादाकांत धनविजय

15. भाषेच्या संपर्क-माध्यम या कार्यासाठी विनिमय माध्यम, संदेशवहनाचे माध्यम, तसेच ........असे शब्दप्रयोग वापरले जातात.

(A) ध्वनिसंकेत (B) संप्रेषण प्रणाली (C) मूलध्वनी (D) नियमांचा व्यूह

16. ध्वनी आणि अर्थ यांना बांधून ठेवणारी परंपरा म्हणजे ................... होय.

(A) संकेत (B) प्रतीक (C) स्वनिम (D) प्रतिमा

17. क्रियाविशेषण म्हणजे काय?

(A) क्रियेविषयी माहिती सांगणारा अविकारी शब्द (B) नामाचा विशेष गुण सांगणारा शब्द

(C) क्रियेची पूर्तता दाखविणारा शब्द (D) विशेषणाचे विशेषण

18. मित्राला पत्र लिहिताना पुढीलपैकी कोणता मायना वापरला जातो?

(A) ती.रा.रा. वसंतराव यांस साष्टांग दंडवत (B) चि. वसंत यास अनेक आशीर्वाद

(C) प्रिय वसंत यास सप्रेम नमस्कार (D) श्री. वसंत यास सादर नमस्कार

19. पुढील पर्यायी संज्ञा व त्यांचे निर्माते यांच्या जोड्या जुळवा :-

| | **संज्ञा** | | **निर्माते** |
|---|---|---|---|
| (a) | लोकतत्त्व | (1) | दुर्गा भागवत |
| (b) | लोक साहित्य | (2) | दत्तो वामन पोतदार |
| (c) | लोकविद्या | (3) | पं. कृष्णदेव उपाध्याय |
| (d) | लोक संस्कृती | (4) | रा. चिं. ढेरे |

(A) a - 4, b - 1, c - 2, d - 4 (B) a - 1, b - 2, c - 3, d - 4

(C) b - 4, c - 2, d - 1, a - 3 (D) c - 1, d - 2, a - 3, b - 4

20. कोणते नृत्य कोणत्या लोकनृत्य प्रकारात येते?

| | **नृत्य** | | **नृत्यप्रकार** |
|---|---|---|---|
| (a) | देवतासंचारानंतर भक्ताचे नृत्य | (1) | विधि नाट्य |
| (b) | जागरण | (2) | अभिचार नृत्य |
| (c) | सोंगाड्याचा नाच | (3) | उत्सवसंबंध्द नृत्य |
| (d) | गजीनृत्य | (4) | लोकनाट्यांतर्गत नृत्य |

(A) a - 1, b - 2, c - 3, d - 4 (B) a - 2, b - 1, c - 4, d - 3

(C) a - 4, b - 3, c - 2, d - 1 (D) a - 3, b - 4, c - 1, d - 2

21. पुढील ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या लावा.

| | ग्रंथ | | ग्रंथकार |
|---|---|---|---|
| (a) | लज्जागौरी | (1) | गोविंद गारे |
| (b) | लोकबंध | (2) | द. ग. गोडसे |
| (c) | मातावळ | (3) | रा. चिं. ढेरे |
| (d) | आदिवासी कलाविश्व | (4) | अनिल सहस्रबुध्दे |

(A) a - 2, b - 1, c - 4, d - 3
(B) a - 4, b - 3, c - 1, d - 2
(C) a - 1, b - 2, c - 3, d - 4
(D) a - 3, b - 4, c - 2, d - 1

22. महानुभाव ग्रंथकार आणि त्यांचे ग्रंथ ओळखा.

| | ग्रंथकार | | ग्रंथ |
|---|---|---|---|
| (a) | भास्करभट्ट बोरीकर | (1) | 'सह्याद्रिवर्णन' |
| (b) | दामोदर पंडित | (2) | 'शिशुपाळ वध' |
| (c) | नरेंद्र | (3) | 'रुक्मिणीस्वयंवर' |
| (d) | रवळोबास | (4) | 'वछाहरण' |

(A) a - 2, b - 4, c - 3, d - 1
(B) a - 1, b - 3, c - 4, d - 2
(C) a - 3, b - 2, c - 1, d - 4
(D) a - 4, b - 1, c - 2, d - 3

23.

| | संतवचने | | संत |
|---|---|---|---|
| (a) | 'आम्हां घरीं धन शब्दांचींच रत्नें' | (1) | ज्ञानदेव |
| (b) | 'पैल तो गे काऊ कोकताहे' | (2) | तुकाराम |
| (c) | 'मुंगी उडाली आकाशी' | (3) | नामदेव |
| (d) | 'नाचूं कीर्तनाचे रंगीं' | (4) | मुक्ताबाई |

(A) a - 1, b - 2, c - 3, d - 4
(B) a - 3, b - 4, c - 1, d - 2
(C) a - 2, b - 1, c - 4, d - 3
(D) a - 4, b - 3, c - 2, d - 1

24.

| | काव्योक्ती | | कवी |
|---|---|---|---|
| (a) | 'काठोकाठ भरु द्या प्याला' | (1) | मर्ढेकर |
| (b) | 'अनंत अमुची ध्येयासक्ती' | (2) | ग्रेस |
| (c) | 'कितीतरी दिवसांत नाही चांदण्यात गेलो' | (3) | केशवसुत |
| (d) | 'भय इथले संपत नाही' | (4) | कुसुमाग्रज |

(A) a - 3, b - 4, c - 1, d - 2
(B) a - 2, b - 3, c - 4, d - 1
(C) a - 1, b - 2, c - 3, d - 4
(D) a - 4, b - 1, c - 2, d - 3

25. नाटक आणि नाटककार यांच्या जोड्या जुळवा.

| | **गट - 1** | | **गट - 2** |
|---|---|---|---|
| (a) | 'दुसरा पेशवा' | (1) | चिं. त्र्यं. खानोलकर |
| (b) | 'एक शून्य बाजीराव' | (2) | पु. ल. देशपांडे |
| (c) | 'तुझे आहे तुजपाशी' | (3) | वि. वा. शिरवाडकर |
| (d) | 'घाशीराम कोतवाल' | (4) | विजय तेंडुलकर |

(A) a - 3, b - 1, c - 2, d - 4 (B) a - 1, b - 2, c - 4, d - 3

(C) a - 2, b - 4, c - 3, d - 4 (D) a - 4, b - 3, c - 4, d - 2

26. अभ्यासकांचे अभ्यास विषय निश्चित करा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | दुर्गा भागवत | (1) | लोकसाहित्य |
| (b) | मिलिंद मालशे | (2) | भाषा विज्ञान |
| (c) | अर्जुनवाडकर | (3) | व्याकरण |
| (d) | वा. ल. कुलकर्णी | (4) | समीक्षा |

(A) a - 1, b - 2, c - 3, d - 4 (B) a - 2, b - 3, c - 4, d - 1

(C) a - 3, b - 4, c - 1, d - 2 (D) a - 4, b - 1, c - 2, d - 3

27. जोड्या जुळवा

| | **गट - 1** | | **गट - 2** |
|---|---|---|---|
| (a) | 'रणांगण' | (1) | वि. स. खांडेकर |
| (b) | 'दोन मने' | (2) | विश्राम बेडेकर |
| (c) | 'आभरान' | (3) | उध्दव शेळके |
| (d) | 'धग' | (4) | पार्थ पोळके |

(A) a - 1, b - 4, c - 3, d - 2 (B) a - 2, b - 1, c - 4, d - 3

(C) a - 4, b - 3, c - 2, d - 1 (D) a - 3, b - 2, c - 1, d - 4

28. **विधान :** भाषा ही मूलत: ध्वनिरुप आहे.

**तर्क :** ध्वनीमुळे भाषेला अर्थ प्राप्त होतो.

(A) विधान आणि तर्क दोन्ही बरोबर. (B) विधान बरोबर, पण तर्क चुकीचा.

(C) विधान आणि तर्क दोन्ही चूक. (D) विधान चूक, पण तर्क बरोबर.

29. **विधान :** स्वनिम हा भाषेतील लघुत्तम घटक असतो.

**तर्क :** वैधर्म्ययुक्त विनियोग हे स्वनिमाचे महत्वपूर्ण तत्त्व आहे.

(A) विधान आणि तर्क दोन्ही बरोबर आहेत.

(B) विधान बरोबर आहे, परंतु तर्क बरोबर नाही.

(C) तर्क बरोबर असला तरी विधान चुकीचे आहे.

(D) विधान आणि तर्क दोन्ही चुकीचे आहेत.

30. "कर्म, क्रियापद, कर्ता हा मराठीतील वाक्यरचनेचा पदक्रम होय" असे विधान शास्त्रीय मराठी व्याकरण या ग्रंथात मोरो केशव दामले यांनी केले आहे.

(A) वरील विधान संपूर्ण बरोबर आहे.

(B) वरील विधानातील सर्व उल्लेख चुकीचे आहेत.

(C) वरील विधानातील पूर्वार्ध चुकीचा आहे.

(D) वरील विधानातील उत्तरार्धात चुकीचे उल्लेख आहेत.

31. मुक्त आविष्कारशैली हे लोकनाट्याचे प्रधान वैशिष्ट्य असून काटेकोर संहितापालन हा त्याचा धर्म होय.

(A) वरील विधान संपूर्ण बरोबर आहे.

(B) वरील विधान संपूर्ण चूक आहे.

(C) वरील विधानाचा पूर्वार्ध बरोबर आहे, पण उत्तरार्ध बरोबर नाही.

(D) वरील विधानाचा पूर्वार्ध चुकीचा असला तरी उत्तरार्ध बरोबर आहे.

32. गंगाधर गाडगीळ हे नवकथेचे प्रमुख शिल्पकार आहेत.

कारण : त्यांनी स्त्री पुरुष प्रेमाचे उदात्त चित्रण केले आहे.

(A) वरील विधान संपूर्ण बरोबर आहे.

(B) वरील विधानातील कारण संपूर्ण चुकीचे आहे.

(C) वरील विधान संपूर्ण चुकीचे आहे.

(D) वरील विधानाचा मुख्यार्थ बरोबर नाही, पण कारणात दिलेला उल्लेख सत्य आहे.

33. प्रतिभा ही अपूर्व वस्तु निर्माण करणारी प्रज्ञा आहे.

कारण :

(A) प्रतिभा ही वेडाची बहीण आहे.

(B) प्रतिभा ही ईश्वराची देणगी आहे.

(C) प्रतिभेमुळे नव्या आशयाची निर्मिती होते.

(D) प्रतिभा ही प्रज्ञावंताची प्रक्रिया आहे.

34. ‘दिवस बुडाला, सूर्य मावळला!’ ह्या उद्‌गारांचे संदर्भानुसार वेगवेगळे अर्थ होतात.

कारण :

(A) प्रत्येक ठिकाणचा सूर्यास्त वेगवेगळया वेळी होतो.

(B) बोलणारी व्यक्ती आणि प्रसंग वेगवेगळे असतात.

(C) भाषेच्या प्रादेशिक बोली वेगवेगळया असतात.

(D) भाषेला लाक्षणिक अर्थाचा पदर असतो.

35. विधान : ध्वनी हाच काव्याचा आत्मा आहे, असे आनंदवर्धनाचे मत आहे.

कारण : आनंदवर्धन नादमाधुर्याला काव्याचे प्राणतत्त्व मानतो.

(A) विधान आणि कारण दोन्हीही सत्य आहेत.

(B) विधान असत्य आहे, परंतु कारणामध्ये केलेला उल्लेख सत्य आहे.

(C) विधान आणि कारण दोन्हीही असत्य आहेत.

(D) विधान सत्य आहे, परंतु कारणामधील उल्लेख सत्य नाही.

36. विधान : मर्ढेकरांना नव काव्याचे जनक मानतात.

कारण : त्यांनी नव्या प्रकारच्या बालकविता देखील लिहिल्या.

(A) विधान आणि कारण दोन्हीही असत्य आहेत.

(B) विधान सत्य आहे, परंतु कारणामध्ये केलेला उल्लेख सत्य नाही.

(C) विधान सत्य नाही, परंतु कारणामध्ये केलेला उल्लेख सत्य आहे.

(D) विधान आणि त्याचे कारण दोन्हीही सत्य आहेत.

37. विभक्ति प्रत्ययांना स्वतंत्र अर्थ नसतो; पण शब्दयोगी अव्ययांना स्वतंत्र अर्थ असतो.

(A) विधानाचा पूर्वार्ध बरोबर आहे, परंतु उत्तरार्ध चूक आहे.

(B) विधानाचा पूर्वार्ध चूक आहे, परंतु उत्तरार्ध बरोबर आहे.

(C) विधान संपूर्णपणे बरोबर आहे.

(D) विधान संपूर्णपणे चुकीचे आहे.

38. भारतात दोन भाषा कुलांतील भाषा बोलल्या जातात; त्यांपैकी मराठी ही इंडो-युरोपियन कुलातील भाषा आहे.

(A) विधानाचा फक्त पूर्वार्ध बरोबर आहे.

(B) विधानाचा फक्त उत्तरार्ध बरोबर आहे.

(C) विधान संपूर्णपणे चुकीचे आहे.

(D) विधान संपूर्णपणे बरोबर आहे.

39. पदरचनेसाठी अमृतराय आणि मध्वमुनीश्वर जसे प्रसिध्द आहेत, तसेच आख्यानकाव्यासाठी अनंतफंदी प्रसिध्द आहेत.

(A) विधानाच्या पूर्वार्धातील उल्लेख सत्य आहे, परंतु उत्तरार्ध बरोबर नाही.

(B) विधानातील सर्वच उल्लेख चुकीचे आहेत.

(C) विधान संपूर्णपणे सत्य आहे.

(D) विधानाच्या पूर्वार्धातील उल्लेख चुकीचा आहे, पण उत्तरार्धातील उल्लेख सत्य आहे.

40. वा. म. जोशी जसे कादंबरीकार म्हणून प्रसिध्द आहेत, तसेच ते उत्तम कवीही होते.

(A) विधान संपूर्णपणे सत्य आहे.

(B) विधानातील सर्व उल्लेख असत्य आहेत.

(C) विधानाच्या पूर्वार्धातील उल्लेख सत्य आहे, परंतु उत्तरार्ध चुकीचा आहे.

(D) विधानाच्या पूर्वार्धातील उल्लेख बरोबर नाही, पण उत्तरार्ध मात्र सत्य आहे.

41. शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांच्या कादंबऱ्यांचे मराठीत अनुवाद करण्याचे कार्य भा.वि. वरेरकर आणि ना. सी. फडके यांनी केले.

(A) वरील विधानातील अनुवादकांची दोन्ही नावे बरोबर आहेत.

(B) वरील विधानातील पहिले नाव बरोबर आहे, पण दुसरे चुकीचे आहे.

(C) वरील विधानातील अनुवादकांची दोन्ही नावे चुकीची आहेत.

(D) वरील विधानातील पहिले नाव चुकीचे आहे, पण दुसरे बरोबर आहे.

42. राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाची बातमी वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर असते, आणि स्थानिक दृष्ट्या महत्त्वाची बातमी आतील पृष्ठावर असते.

(A) वरील विधानातील दोन्ही उल्लेख चुकीचे आहेत.

(B) वरील विधान संपूर्णपणे बरोबर आहे.

(C) विधानातील पूर्वार्ध बरोबर आहे, पण उत्तरार्ध बरोबर नाही.

(D) विधानातील पूर्वार्ध बरोबर नाही, पण उत्तरार्ध बरोबर आहे.

43. भरताने नाट्यशास्त्रात रसतत्त्वाचे विवेचन केले असून एकंदर आठ रस मानलेले आहेत.

(A) हे विधान संपूर्णपणे बरोबर आहे.

(B) विधानातील सर्व उल्लेख चुकीचे आहेत.

(C) विधानाचा पूर्वार्ध बरोबर आहे, पण उत्तरार्ध चुकीचा आहे.

(D) विधानाचा पूर्वार्ध बरोबर नाही, पण उत्तरार्ध बरोबर आहे.

44. भाषिक परिवर्तनाचे एक कारण राजकीय स्थित्यंतर हे असून नवीन शब्दांचे आदान-प्रदान हे आणखी एक कारण आहे.

(A) वरील विधानातील दोन्ही कारणे चुकीची आहेत.

(B) पहिले कारण बरोबर आहे, पण दुसरे चुकीचे आहे.

(C) दोन्ही कारणे बरोबर आहेत.

(D) पहिले कारण चुकीचे आहे, पण दुसरे बरोबर आहे.

45. अतिशय, अभिमान, अवगुण, पीतांबर, दगडफेक हे सर्व उपसर्गघटित शब्द आहेत.

(A) वरील विधान बरोबर आहे.

(B) वरीलपैकी तीन शब्द उपसर्गघटित आहेत.

(C) वरील पैकी तीन शब्द उपसर्गघटित नाहीत.

(D) वरीलपैकी एक ही शब्द उपसर्गघटित नाही.

**पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे द्या :-**

समाज म्हणजे दगडाचा एकसंघ चिरा नाही, हे खरे. आणि देश व काल यांच्या पलीकडे असलेला वैश्विक मानव म्हणून काही चीज अस्तित्वात नसते हेही खरे. पण याचा अर्थ असा नाही की, प्रत्येक माणूस स्वतंत्र बेट असून माणसामाणसांत अजिबात साम्य नसते. त्यांच्यात भेद असतात, त्याचप्रमाणे साम्यही असते. विशेषत: कोणत्याही कालखंडात दिसून येणारे मानवी समस्यांचे सारखेपण आपण या संदर्भात लक्षात ठेवले पाहिजे. प्रत्येक माणसासमोर त्याच्या व्यक्तिगत समस्या असतात, त्याचप्रमाणे तो ज्या समाजाचा घटक असेल त्या समाजातील सर्व घटकांना समान असलेल्या समस्याही त्याच्यासमोर असतात. या समस्यांविषयी सर्वांच्या प्रतिक्रिया सारख्या नसतील, त्या सोडविण्यासाठी त्यांनी सुचविलेले मार्ग वेगवेगळे असतील, पण या समस्या मात्र एकच असतात. समाज-जीवनाचा मध्यवर्ती स्त्रोत म्हणजे या समस्या होत. उदाहरणार्थ, आपल्या देशात दिसणारे भयानक दारिद्र्य, वरपासून खालपर्यंत दिसणारा भ्रष्टाचार, सर्व ठिकाणी प्रत्यक्ष व्यवहारात दिसणारे बुध्दिमांद्य, आळस, स्वार्थ, सुखलोलुपता, फुटीरपणा या आपल्या समाजापुढच्या काही समान समस्या आहेत. श्रीमंत व गरीब, सुशिक्षित व अशिक्षित, पुढारलेले व मागासलेले या सर्वांपुढे त्या आवासून उभ्या आहेत. जोपर्यंत मुंबईत गलिच्छ वस्त्या आहेत तोपर्यंत पेडर रोडवरील श्रीमंतांच्या आरोग्यालाही धोका आहे. कोणीतरी इंजीनिअर लाच खातो म्हणून नुकत्याच बांधलेल्या रस्त्यावरही खड्डे दिसू लागतात आणि त्यामुळे गरिबाची सायकल जशीं मोडते तशी श्रीमंतांची इंपाला सुध्दा बिघडते. आपले सर्वांचे व्यक्तिजीवन या समान समस्यांशी निगडीत झाले आहे. त्यामुळे व्यक्ति जीवनाचे चित्रण करताना समाज जीवनाचे चित्रण अपरिहार्यपणे येते. कलावंताने व्यक्ति जीवनभर जरुर लिहावे. पण असे करताना त्याला समाज जीवनाचा विसर पडून उपयोग नाही.

46. माणूस आणि समाज यांच्यामध्ये कोणत्या प्रकारचा संबंध असतो ?

(A) समाजातील सर्व माणसे एकासारखी एक असतात.

(B) सर्व माणसांतील समान गुण हे समाजाचे गुण असतात.

(C) प्रत्येक माणूस संपूर्णपणे स्वतंत्र असतो.

(D) माणसामाणसांत काही साम्ये असतात आणि काही भेद असतात.

47. मानवी समस्यांचे स्वरुप कसे असते ?

(A) मानवी समस्या सारख्याच प्रकारच्या असतात.

(B) व्यक्तिगत समस्या आणि सामाजिक समस्या यांत संघर्ष असतो.

(C) सर्व घटकांना समान असलेल्या समस्या मोजक्याच असतात.

(D) समस्यांविषयीच्या सर्वांच्या प्रतिक्रिया सारख्या असतात.

48. 'समाज जीवनाचा मध्यवर्ती स्त्रोत' असे समस्यांना का म्हटले आहे ?

(A) समस्यांमुळे समाजाचे पोषण होते.

(B) समस्या एका केंद्रापासून सर्वत्र पाझरत जातात.

(C) समाजातील सर्व माणसांना या समस्या समान असतात.

(D) समस्या नसतील तर समाज मृतवत् होईल.

49. समाजातील माणसांच्या कोणकोणत्या प्रकारच्या ध्रुवीकरणांचा उल्लेख उताऱ्यात आलेला आहे ?

(A) श्रीमंत – गरीब, सुशिक्षित – अशिक्षित, स्त्री – पुरुष

(B) श्रीमंत – गरीब, सुशिक्षित – अशिक्षित, पुढारलेले – मागासलेले

(C) गलिच्छ वस्त्या – पेडर रोड, श्रीमंत – गरीब, सायकल – इंपाला

(D) दरिद्र्य, भ्रष्टाचार, बुध्दिमांद्य, आळस, स्वार्थ, सुखलोलुपता

50. व्यक्ति जीवनाचे चित्रण आणि समाजजीवनाचे चित्रण यांत कोणता संबंध असतो ?

(A) साम्य (B) परस्परावलंबन

(C) अपरिहार्यता (D) कार्यकारणभाव

- o O o -

**Space For Rough Work**